तरुण भारत संवाद
गुरुवार, दि. १३ जून २०२४

# 'डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचाराचा वारसा जपावा'



कोल्हापूर : मार्गदर्शन करताना दत्तात्रय घारे, सोबत डॉ. आर. व्ही. शेजवळ, प्राचार्या शुभांगी गावडे, नामदेवराव कांबळे, कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, एस. एम. गवळी, कौस्तुभ गावडे आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रत्येक कर्तृत्ववान व्यक्तिमागे एक शिक्षक असतो. त्यामुळे शिक्षकांनी आपली कर्तव्ये जपली पाहिजेत. शिक्षकांनी अध्यापनात प्रयोगशीलता जपली पाहिजे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचाराचा वारसा पुढे नेने हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा, वाबळेवाडीचे जनक दत्तात्रय वारे (गुरुजी) यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणयज्ञात बापूजींनी अव्याहतपणे कार्य केले. विद्यार्थ्याला घडविणे हे प्रत्येक शिक्षकाचे उद्दिष्ट असायला हवे.

प्रास्ताविक संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. पाहुण्यांची ओळख संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी करुन दिली. आभार संस्थेचे सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी यांनी मानले. सुत्रसंचालन डॉ. कविता तिवडे, प्रा. गीतांजली साळुंखे यांनी केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख उपस्थित होते.

13/06/2024